सकाळ



### पुणे, सातारा आणि सोलापूर प्रशासनातर्फे विशेष नियोजन

# महिला आयोगाची १० जूनपासून 'आरोग्य वारी'

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. ६ : आषाढी एकादशीला विठूरायाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपूरकडे पायी निघणाऱ्या लाखो महिला वारकऱ्यांच्या स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने राज्य महिला आयोगाकडून १० जूनपासून 'आरोग्य वारी' आयोजित करण्यात आली आहे. त्यासाठी पुणे, सातारा आणि सोलापूर प्रशासन सज्ज झाले असून तीनही जिल्ह्यांत आवश्यक त्या सोयी-सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी स्वतः यंत्रणांच्या तयारीचा आढावा घेतला.



संग्रहित छायाचित्र.

'आरोग्य वारी'चा शुभारंभ शनिवारी (ता. १०) पुण्यातील निवडुंगा विठ्ठल मंदिरातून होणार आहे. २९ जूनला आषाढी एकादशीपर्यंत लाखो वारकरी पायी पंढरपुरात दाखल होणार आहेत. त्यात महिलांची संख्याही लक्षणीय असते. त्यांच्या स्वच्छ आणि सुरक्षित वारीसाठी राज्य महिला आयोगाकडून 'आरोग्य वारी' उपक्रम राबविण्यात येत आहे. चाकणकर यांनी तयारीचा आढावा घेत आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरविण्याचे निर्देश दिले आहेत.

## महिलांसाठी विशेष सोय

पुणे जिल्ह्यातील पालखी मार्गावर महिला भाविकांसाठी ४८८ आरोग्य कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. ८७ ॲम्ब्युलन्स पथक नेमण्यात आले असून प्रत्येक पथकात एक महिला कर्मचारी असेल. मुक्कामाच्या ठिकाणी २४ पथके किमान एक महिला कर्मचाऱ्यासह नियुक्त असतील. त्याशिवाय कार्डिओ आणि ॲम्ब्युलन्ससाठी आवश्यक औषध पुरवठा करून ठेवण्यात आला आहे. महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिनची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासह पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची सुविधा आणि महिलांसाठी १४०० शौचालयांची व्यवस्था करण्यात आली आहे. पाणी, वीज, महिला समन्वयक इत्यादींची व्यवस्थाही करण्यात आली आहे.

तीनही जिल्ह्यांतील प्रशासन आणि पोलिसांनी उत्तम तयारी केली असून आवश्यक गोष्टींची अंमलबजावणी झाली आहे. पंढरीच्या ओढीने निघालेल्या लाखो महिला वारकऱ्यांना सुरक्षित व स्वच्छ वारीचा आनंददायी अनुभव मिळावा यासाठी आयोग प्रयत्नशील आहे.

- रूपाली चाकणकर, अध्यक्षा, राज्य महिला आयोग

## अशी आहे व्यवस्था

- महिलांसाठी १६ प्राथमिक आरोग्य केंद्रे व आठ उपकेंद्रांत हिरकणी कक्ष
- पिण्याचे पाणी आणि शौचालयांसह तात्पुरती निवारा व्यवस्था
- प्राथमिक उपचार सुविधा देणारे अधिकारी-कर्मचारी तैनात
- महिला वारकऱ्यांसाठी स्वतंत्र बेडची व्यवस्था
- महिला निवारा कक्षात महिला नोडल अधिकारी. २१ ठिकाणी हिरकणी कक्ष तयार
- निवारा कक्षात निर्भया पथकाची गस्त
- ४० ठिकाणी हिरकणी कक्ष. २५ डॉक्टरांचे पथक